# जाहिरात

**शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती करणे.**

१. **शिकाऊ उमेदवारी पदांची एकुण संख्या** - ५० ( इलेक्ट्रेशियन - ३०, वायरमन - २० )

२.**शैक्षणिक पात्रता** - १० वी उत्तीर्ण व मागील तीन शैक्षणिक ( २०२३, २०२४ व २०२५ ) वर्षात मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दोन वर्षाचा तारतंत्री / वीजतंत्री आय. टी. आय. परिक्षा उत्तीर्ण आवश्यक.

३.**आवश्यक गुण** - खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी किमान ६५% व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ६०% गुण आवश्यक.

४.**वयोमर्यादा** - १८ वर्षे ते ३० वर्षे ( अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी ०५ वर्षे शिथील. )

५.**कामाचे ठिकाण** - भुसावळ विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कोठेही.

६.फक्त जळगांव जिल्ह्यातील रहिवाशी उमेदवारांना अर्ज करता येतील.

७.उमेदवारांना महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल.

८.उमेदवारांनी शिकाऊ उमेदवारी अर्जासोबत, मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र ( BTRI) यांच्या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी केलेला ऑनलाईन रजिस्ट्रेशन अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला, १० वी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र, आय. टी. आय. गुणपत्रक (सर्व सत्रांचे) व प्रमाणपत्र, जातीचा दाखला व अद्यावत केलेले आधार कार्ड ची एक छायांकित प्रत स्वयंम साक्षांकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९.उमेदवारांनी आपली शैक्षणिक व इतर आवश्यक असलेले कागदपत्रे खालील दर्शविलेल्या कालावधीत व वेळापत्रकानुसार, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, चोपडे बिल्डींग, यावल रोड, भुसावळ जि. जळगांव येथे जमा करावी.

**वेळापत्रक** -

| कागदपत्र जमा करण्याचे ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|
| कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, चोपडे बिल्डींग, यावल रोड, भुसावळ जि. जळगांव. | दि.२०.०७.२०२६ ते दि.२२.०७.२०२६ | सकाळी १०.०० ते १७.३० पर्यंत |

वरीलप्रमाणे जाहिराती मध्ये / जाहिरातीच्या काही भागामध्ये / शिकाऊ उमेदवारांच्या भरतीमधील नमुद संख्येमध्ये / अंशत: बदल करण्याचे किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकारी हे कंपनी राखुन ठेवत आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

टिप : दि.२०.०७.२०२६ ते दि.२२.०७.२०२६ या कालावधीत आलेल्या उमेदवारांची कागदपत्रे स्विकारले जातील दि.२२.०७.२०२६ नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**सही**
**कार्यकारी अभियंता**
**म. रा. वि. वितरण कं. मर्या., भुसावळ विभाग.**

पी.आर.ओ.नं. ७४/ २०२६-२०२७.
संपर्क क्र. ७८७५००४४२६

Mahabharti.in